## मोदी सरकारचा निर्णय

# श्रीलंकेला देणार ४० हजार टन डिझेल

**मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या श्रीलंकेला (Sri Lanka) केंद्र सरकारने तातडीने डिझेल (Diesel) देण्याची घोषणा केली आहे. सरकारी मालकीची तेल कंपनी इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लवकरच 40,000 टन डिझेलचा पुरवठा करणार आहे. हे डिझेल श्रीलंकेला पाठवण्यात येणाऱ्या पेट्रोल, डिझेल आणि विमान इंधनाच्या सात मासिक शिपमेंट व्यतिरिक्त राहणार आहे.

गेल्या काही दिवसांपासून श्रीलंकेत अचानक डिझेलचा मोठा दुष्काळ निर्माण झाला होता. त्यानंतर श्रीलंकेने भारताकडे मदत मागितली होती. इंधनाच्या वाहतुकीची व्यवस्था करण्यातही अडचणी येत असल्याचे सांगण्यात येत आहे. तेल मंत्रालय आणि इंडियन ऑइल कॉर्पोरेशनने याप्रकरणी पाठवलेल्या ई मेलला प्रतिसाद दिला नाही. वाणिज्य मंत्रालयाच्या एका अधिकाऱ्याने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले की, रशियाने युक्रेनवर केलेल्या हल्ल्यानंतरच्या जागतिक परिस्थितीमुळे पुरवठा साखळी विस्कळीत झाली आहे. वाहतूक सुविधांच्या उपलब्धतेसारख्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी सरकार आणि उद्योग एकमेकांबरोबर समन्वय साधत आहेत. भारतीय बँक आणि श्रीलंका सरकारने 2 फेब्रुवारी रोजी भारताकडून पेट्रोलियम उत्पादनांच्या खरेदीसाठी 50 कोटी डॉलर क्रेडिट लाइनच्या करारावर स्वाक्षरी केली होती.

### केंद्र सरकारचा नवा निर्णय



केंद्र सरकारचा नवा निर्णयही महत्त्वाचा आहे कारण युक्रेन संघर्षामुळे जागतिक बाजारपेठेत इंधनाचा पुरवठा आणि किमतीत अडचणी येत आहेत. युक्रेन आणि रशियामधील युद्धामुळे कच्च्या तेलाच्या किमतीही विक्रमी वाढल्या आहेत. देशातही पेट्रोल डिझेलच्या किंमतीत पुन्हा वाढत आहेत. तसेच भारताने आता रशियाकडूनही कच्चे तेल खरेदी करण्यास सुरुवात केली आहे. अशा परिस्थितीत भारताने श्रीलंकेला तत्काळ डिझेल पुरवठा करण्याच्या दिशेने हालचाली सुरू केल्या आहेत. भारताने याआधीही श्रीलंकेला इंधन पुरवठा केला आहे. दरम्यान, श्रीलंकेत सध्या तांदूळ आणि साखर 290 रुपये किलोने विकली जात आहे. 400 ग्रॅम दूध पावडरची किंमत 790 रुपये आहे. गेल्या तीन दिवसांत दूध पावडरच्या दरात 250 रुपयांनी वाढ झाली आहे. श्रीलंका सरकारने पेपर्सच्या कमतरतेमुळे शालेय परीक्षा अनिश्चित काळासाठी पुढे ढकलल्या आहेत, अशा अनेक अडचणी या देशात निर्माण झाल्या आहेत. चीनचे श्रीलंकेवर 5 अब्ज डॉलर्सचे कर्ज आहे. गेल्या वर्षी, देशातील आर्थिक संकटावर मात करण्यासाठी चीनकडून आणखी 1 अब्ज डॉलरचे कर्ज घेतले होते. पुढील 12 महिन्यांत श्रीलंकेला देशी आणि विदेशी कर्ज परत करण्यासाठी सुमारे 7.3 अब्ज डॉलरची गरज आहे. नोव्हेंबरपर्यंत, देशातील परकीय चलनाचा साठा केवळ 1.6 अब्ज डॉलर्स होता.

# गृहकर्ज मिळेल आता झटपट

**मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** स्टेट बँक ऑफ इंडियाने (एसबीआय) आघाडीच्या पाच गृह वित्त कंपन्याशी (एचएफसीज) करार केला असून त्यात पीएनबी हाउसिंग फायनान्स लिमिटेड, आयआयएफएल होम फायनान्स लिमिटेड, श्रीराम हाउसिंग फायनान्स लिमिटेड, एडेलवाइज हाउसिंग फायनान्स लिमिटेड आणि कॅप्री ग्लोबल हाउसिंग फायनान्स लिमिटेड यांचा समावेश आहे. या कराराअंतर्गत आरबीआयच्या मार्गदर्शक तत्वांनुसार वंचित व दुर्लक्षित घटकांना गृह कर्ज मंजूर केले जाणार आहे.

### 'एसबीआय'चा मोठा निर्णय




**सामंजस्य करारानुसार को-लँडिंग मॉडेलअंतर्गत गृहकर्ज**

**वंचित व दुर्लक्षित घटकांना गृहकर्जासाठी वित्तपुरवठा**

**'2024 पर्यंत सर्वांसाठी घर' या धोरणाला चालना**

### वंचित व दुर्लक्षित घटकांना प्राधान्य

आरबीआयने बँका, एचएफसीज/एनबीएफसीजसाठी प्रायोरिटी क्षेत्रासाठी सह-कर्जपुरवठ्याशी संबंधित मार्गदर्शक तत्वे जारी केली असून त्यामागे अर्थव्यवस्थएतील वंचित व दुर्लक्षित घटकांना मिळणाऱ्या कर्जपुरवठ्यात वाढ व्हावी आणि कर्जदारांना परवडणाऱ्या किंमतीत निधी उपलब्ध व्हावा असे उद्दिष्ट आहे. को-लेंडिंग मॉडेलमुळे कर्जदाराला सर्वोत्तम व्याजदर आणि अधिक चांगली व्याप्ती मिळते. श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड या अग्रगण्य परवडणाऱ्या गृहनिर्माण वित्त कंपनीने आज प्राधान्य क्षेत्रातील परवडणाऱ्या गृहकर्जासाठी भारतातील सर्वात मोठी बँक स्टेट बँक ऑफ इंडियासोबत सह-कर्ज करारावर स्वाक्षरी केल्याची घोषणा केली. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या २० :८० को-लेंडिंग मॉडेलनुसार दोन्ही संस्था संयुक्तपणे गृहनिर्माण कर्ज ग्राहकांना सेवा देतील.

### परवडणाऱ्या घरांचा अभाव

परवडणाऱ्या घरांचा अभाव ही भारतापुढची मोठी समस्या आहे, विशेषत: आर्थिकदृष्ट्या कमकुवत गट (ईडब्ल्यूएस) आणि समाजातील अनौपचारिक गटाला ही समस्या जास्त प्रमाणात जाणवते. या क्षेत्रातील सेवेची व्याप्ती विस्तारण्यासाठी एसबीआय वेगवेगळ्या एचएफसीसह सह-कर्जपुरवठ्याच्या संधींच्या शोधात आहे. या सहकार्यामुळे आम्ही वंचित तसेच दुर्लक्षित गटातील जास्तीत जास्त गृह कर्जदारांपर्यंत पोहोचून कर्ज पुरवठ्याचे उद्दिष्ट ठेवले असून त्यामुळे आमचे वितरण नेटवर्क विस्तारण्यास मदत होईल.

## # QUICK NEWS

### एअरटेलने केले ८८१५ कोटी जमा

**मुंबई.** दूरसंचार कंपनी भारती एअरटेलने 2015 च्या लिलावात घेतलेल्या स्पेक्ट्रमची बाकी 8815 कोटी रुपये सरकारी खजिन्यात वेळेपूर्वी भरले आहे. ही रक्कम 2026-2027 आणि 2027-2028 या आर्थिक वर्षांसाठी देणे होती.

**स्पेक्ट्रम लिलावाची थकबाकी वेळेपूर्वीच भरली**

भारती एअरटेलने गेल्या चार महिन्यांत सरकारला 24,334 कोटी रुपये दिले आहे. स्पेक्ट्रल घेतल्यानंतर उशिरा पेमेंटसाठी 10 टक्के दराने व्याज द्यावे लागते. मुदतीपूर्वी रक्कम जमा केल्याने व्याजाची रक्कम वाचणार आहे. यामुळे कंपनीला 4जी कव्हरेज वाढवण्यास आणि येत्या काही दिवसांत 5जी स्पेक्ट्रमच्या लिलावात सहभागी होण्यास मदत होणार आहे. डिसेंबरमध्ये एअरटेलने 2014 च्या लिलावात खरेदी केलेल्या स्पेक्ट्रमसाठी दूरसंचार विभागाला 15,519 कोटी रुपये दिले होते. सरकारची थकबाकी मुदतीपूर्वी भरल्याचा परिणाम शुक्रवारी भारती एअरटेलच्या शेअरवरही दिसून आला.

# सोन्याच्या दरात आज पुन्हा तेजी

**मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** सोन्याच्या दरात आठवड्याच्या शेवटच्या दिवशी पुन्हा एकदा वाढ झाली आहे. गुड रिटर्न्स वेबसाइटनुसार दहा ग्रॅम अर्थात प्रति तोळा सोन्याची किंमत आज बाजार सुरू होताच 47950 रुपयांवर पोहोचली आहे. गुरुवारी बाजार प्रति तोळा 47350 रुपयांवर बंद झाला होता. याचाच अर्थ आज सोन्याच्या दरात प्रति तोळ्यामागे 600 रुपयांची वाढ झाली आहे. तर आज चांदीचा भाव 68500 रुपये इतका आहे. गेल्या काही दिवसांपासून सोन्याच्या दरात सातत्याने चढ-उतार सुरू असल्याचे पहायला मिळत आहे. रशिया आणि युक्रेनमध्ये सुरू असलेल्या युद्धाचा जागरिक बाजारपेठेवर परिणाम झाला असून, काही दिवसांपूर्वी सोन्याच्या किमती चांगल्याच कडाडल्या होत्या, मात्र त्यानंतर त्यामध्ये घसरण पहायला मिळाली. आज पुन्हा एकदा सोन्याचे दर सहाशे रुपयांनी वाढेले आहेत. सोन्याच्या दरात सातत्याने चढ-उतार पहायला मिळत असल्याने गुंतवणूकदारांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. आज आर्थिक राजधानी मुंबईमध्ये सोन्याचे दर प्रति तोळा 47950 इतके आहे. तर चांदीचा दर 68500 प्रति किलो इतका आहे.



### राज्याच्या प्रमुख शहरातील सोन्याचे दर

मुंबईमध्ये 22 कॅरट सोन्याचा दर प्रति तोळा 47950 इतका आहे. तर 24 कॅरट सोन्याचा दर 52,310 इतका आहे. पुण्यात आज 22 कॅरट सोन्याचा भाव 48050 इतका आहे, तर 24 कॅरट सोन्याची किंमत 52,3 50 इतकी आहे. नागपूरमध्ये 22 आणि 24 कॅरट सोन्याचा प्रति तोळा दर अनुक्रमे 48020 आणि 52330 रुपये इतका आहे. तर चांदीचा दर प्रति किलो 68500 रुपये इतका आहे. कालच्या तुलनेमध्ये आज सोने सहाशे रुपयांनी वधारले आहे. रशिया आणि युक्रेन युद्धाचा मोठा परिणाम हा जागतिक बाजारपेठेवर झाला आहे. युद्धामुळे कच्च्या तेलापासून ते खाद्यतेलापर्यंत सर्वच वस्तू महाग झाल्या आहेत. सोन्यासारख्या मौल्यवान धातुच्या किमती देखील वाढल्या आहोत.

## वाढत्या महागाईत जास्त परतावा

# इक्विटी गुंतवणूकदारांमध्ये १० कोटींची वाढ

**दिल्ली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** एका वर्षात इक्विटी शेअर 11.63% ने वाढला आहे. विशेष म्हणजे मार्च 2021 पर्यंत घरगुती मालमत्तेतील इक्विटीचा वाटा 4.3% होता, तर मार्च 2020 पर्यंत इक्विटीमधील देशांतर्गत मालमत्तेची गुंतवणूक फक्त 2.7% होती. त्यानुसार, गेल्या एका वर्षात इक्विटी शेअर 11.63% ने वाढला, परंतु गेल्या दोन वर्षात 77.78% ने वाढ झाली आहे. येत्या काही वर्षांत मंद गतीने का होईना पण इक्विटीमध्येही गुंतवणूक वाढणार आहे.

**मागील दोन वर्षांत याप्रमाणे झाले बदल**

**डीमॅट एसआयपी निफ्टी मिडकॅप स्मॉलकॅप**




### इक्विटीत गुंतवणूक वाढणार

सध्या देशातील 5% पेक्षा कमी घरगुती मालमत्ता इक्विटी मार्केटमध्ये आहे. येत्या काही वर्षांत त्यात आणखी वाढ होईल. कोविड महामारी आणि महागाईसारख्या अनिश्चित वातावरणातही समभागांनी जोरदार परतावा दिला आहे. सध्या, इक्विटीमध्ये गुंतवणूक करण्यासाठी दरमहा सुमारे 20 हजार कोटी रुपये देशांतर्गत फंड हाऊसेस मिळत आहेत, असे एलकेपी सिक्युरिटीजचे संशोधन प्रमुख एस. रंगनाथन यांनी सांगितले.

### गुंतवणुकीचा आलेख वाढता

देशातील समभाग गुंतवणूक वर्षानुवर्षे वाढत आहे. इक्विटीसारख्या धोकादायक मालमत्तेने गेल्या काही वर्षांमध्ये खूप लोकप्रियता मिळवली आहे. देशात कोविड महामारी सुरू झाल्यापासून, घरगुती मालमत्तेतील इक्विटीचा हिस्सा जवळपास 78% ने वाढून 5% च्या नवीन विक्रमी उच्चांकावर पोहोचला आहे, हे विशेष.

### ३९ लाख कोटींपेक्षा जास्त गुंतवणूक

अमेरिकन बहुराष्ट्रीय गुंतवणूक बँक आणि वित्तीय सेवा कंपनी जेफरीजच्या एका अहवालानुसार, या महिन्यात भारतातील 4.8% घरगुती संपत्ती इक्विटीमध्ये गुंतवली गेली आहे. या अहवालात भारताची एकूण देशांतर्गत संपत्ती 10.7 ट्रिलियन डॉलर (सुमारे 816 लाख कोटी रुपये) असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्यानुसार, भारतीय इक्विटीमध्ये 39 लाख कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक सामान्य लोकांनी केली आहे.

# नीती आयोगाच्या निर्यात निर्देशांकात अव्वल

**दिल्ली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क.** नीती आयोगाच्या निर्यात तत्परता निर्देशांक 2021 मध्ये गुजरात राज्याने पहिला क्रमांक प्राप्त केला आहे. त्यानंतर महाराष्ट्र दुसऱ्या तर कर्नाटक तिसऱ्या क्रमांकावर आहे. नीती आयोगाने शुक्रवारी जारी केलेल्या अहवालात ही माहिती देण्यात आली आहे.

निर्यात तत्परता निर्देशांक निर्यात संभावना आणि कामगिरीच्या संदर्भात



राज्यांचे मूल्यमापण करीत असतो. या निर्देशांकात पहिल्या पाचमध्ये तामिळनाडू आणि हरियाणा या राज्यांचाही समावेश आहे.

### दरडोई उत्पन्नात दिल्ली तिसऱ्या क्रमांकावर

याशिवाय दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत सिक्कीम आणि गोव्यानंतर तिसऱ्या स्थानावर दिल्ली आहे. दिल्लीमध्ये 2021-22 मध्ये दरडोई उत्पन्न वार्षिक आधारावर 16.81 टक्क्यांनी वाढून 4,01,982 रुपये झाले. दिल्लीचे उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांनी शुक्रवारी विधानसभेत 2021-22 या आर्थिक वर्षाचा आर्थिक सर्वेक्षण अहवाल सादर केला.

### दरडोई उत्पन्न तिप्पट

या अहवालानुसार, चालू आर्थिक वर्षात दिल्लीतील दरडोई उत्पन्न राष्ट्रीय सरासरीपेक्षा तिप्पट आहे. दिल्लीचा जीएसडीपी 2021-22 या आर्थिक वर्षात 17.65 टक्क्यांनी वाढून 9,23,967 कोटी रुपये झाले आहे. त्यानुसार दिल्लीने 2021-22 मध्ये 1,450 कोटी रुपयांचा महसूल प्राप्त केला आहे. एकंदर देशातील दरडोई उत्पन्नात वाढ होत असून देशात यामुळे समृद्धता येत असल्याचे दिसून येत आहे. इतर राज्यातील नागरिकांच्या उत्पन्नात वाढ होत असल्याने त्यांचे जीवनमान सुधारत असल्याचे स्पष्ट होत आहे. यानंतर यात अधिक वाढ होणार असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

## दहा टीम उतरणार मैदानात

# आजपासून आयपीएलचा थरार

**मुंबई, वृत्तसंस्था.** येत्या 26 मार्चपासून क्रिकेट चाहत्यांना आयपीएलचा थरार पाहायला मिळणार आहे. आयपीएलच्या या पंधराव्या हंगामात दोन संघांची वाढ झाल्यामुळे सर्वच लढती रोमहर्षक होणार आहेत. दरम्यान, सर्वच संघांनी ट्रॉफी जिंकण्यासाठी कंबर कसलेली असताना सर्वांत तरुण खेळाडूंचा समावेश असलेल्या सनरायझर्स हैदराबाद या संघाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. पहिला सामना शनिवारी चॅम्पियन चेन्नई सुपर किंग्ज आणि गेल्या वर्षीचा उपविजेती कोलकाता नाइट रायडर्स यांच्यात खेळला जाणार आहे.

2011 नंतर प्रथमच क्रिकेट विश्वातील सर्वात प्रतिष्ठित टी20 चषकासाठी 10 संघ सामना करणार आहे. यावेळी लखनौ सुपरजायंट्स आणि गुजरात टायटन्सच्या रूपाने दोन नवीन संघ आयपीएलमध्ये दाखल झाले आहेत. कोविडमुळे 25 % प्रेक्षकांना प्रवेश देशातील कोविड-19 ची परिस्थिती नियंत्रणात आल्यानंतर क्रिकेट चाहत्यांना 2019 नंतर प्रथमच स्टेडियममध्ये बसून सामन्यांचा आनंद घेण्याची संधी मिळणार आहे. आयपीएलचे सर्व सामने भारतात खेळवले जातील आणि स्टेडियमच्या क्षमतेपैकी 25 टक्के प्रेक्षक स्टेडियममध्ये जाऊन पाहू शकणार आहेत. दोन नवीन संघांच्या समावेशासह, एकूण सामन्यांची संख्या 60 वरून 74 पर्यंत वाढली आहे, ज्यामुळे स्पर्धा दोन महिन्यांहून अधिक काळ चालणार आहे. तथापि, सर्व संघ साखळी टप्प्यात केवळ 14 सामने खेळू शकणार आहेत. कोरोनामुळे बीसीसीआयला स्पर्धा पुढे ढकलून ती यूएईमध्ये पूर्ण करावी लागली होती. यामुळे साखळी टप्प्यातील सामने मुंबई आणि पुण्यात तीन ठिकाणी होणार असून त्यामुळे विमानाने प्रवास करण्याची गरज भासणार नाही.



### ऑस्ट्रेलियात होणार टी-२० विश्वचषक

या वर्षी ऑस्ट्रेलियात टी-20 विश्वचषक खेळवला जाणार आहे आणि आयपीएल काही भारतीय खेळाडूंचे भवितव्यही ठरणार आहे. मुंबई इंडियन्सचा संघ त्यांच्या घरच्या मैदानावर खेळणार आहे. परंतु याचा फायदा मिळणार नसल्याचे कर्णधार रोहित शर्माने स्पष्ट केले आहे. मात्र, सूर्यकुमार यादव, किरॉन पोलार्ड, जसप्रीत बुमराह आणि इशान किशन या खेळाडूंना अनुकूल परिस्थितीचा पुरेपूर फायदा घेण्याच्या तयारीत आहे.

# ऑस्ट्रेलियाचा पाकवर ऐतिहासिक विजय

### २४ वर्षांनंतरही इतिहासाची पुनरावृत्ती

**लाहोर, वृत्तसंस्था.** ऑस्ट्रेलियाने विजयासाठी ठेवलेल्या 351 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना यजमान पाकिस्तानने नांगी टाकली. 1998 नंतर पाकिस्तान दौऱ्यावर आलेल्या ऑस्ट्रेलियाने इतिहासाची पुनरावृत्ती करीत तीन सामन्यांची कसोटी मालिका 1-0 अशी जिंकली. रावळपिंडी व कराची कसोटी ड्रॉ राहिल्यानंतर तिसऱ्या कसोटीत निकालाची सर्वांना अपेक्षा होती. पण, तो निकाल ऑस्ट्रेलियाच्या बाजूने लागेल असे कुणालाही वाटले नव्हते. कर्णधार बाबर आझम खेळपट्टीवर असेपर्यंत पाकिस्तानी चाहत्यांना आस लागून राहिली होती. पण, नॅथन लियॉनच्या फिरकीने पाकिस्तानचे कंबरडे मोडले.

वॉर्नर आणि उस्मान ख्वाजा यांनी पहिल्या विकेटसाठी 96 धावांची भागीदारी केली. त्यात वॉर्नरने 51 धावा केल्या, तर ख्वाजाने 104 धावांची



खेळी केली. ऑस्ट्रेलियाने दुसरा डाव 3 बाद 227 धावांवर घोषित करून पाकिस्तानसमोर विजयासाठी 351 धावांचे लक्ष्य ठेवले. प्रत्युत्तरात पाकिस्तानने 5 फलंदाज 167 धावांवर गमावले आहेत. इमाम-उल-हक 70 धावा करून माघारी परतला. अब्दुल्लाह शफिक (27), अझर अली (17), फवाद आलम (11), मोहम्मद रिझवान (0) हे अपयशी ठरले. पॅट कमिन्स व नॅथन लियॉन यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या आहेत. कर्णधार बाबर आझम व साजिद खान यांनी पाकिस्तानचा संघर्ष सुरू ठेवला होता, परंतु नॅथन लियॉनच्या गोलंदाजीवर स्टीव्ह स्मिथने स्लीपमध्ये भारी कॅच घेतला.

# इक्वेडोर, उरुग्वे शिवचषकासाठी पात्र

### विश्वचषक फुटबॉल स्पर्धा

**साओ पाउलो, वृत्तसंस्था.** ब्राझील, अर्जेंटिनानंतर, इक्वाडोर आणि उरुग्वे यांनीही या वर्षाच्या अखेरीस कतार येथे होणाऱ्या विश्वचषक फुटबॉल स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे. तिसऱ्या स्थानावर असलेल्या इक्वेडोरला गुरुवारी पॅराग्वेकडून 3-1 असा पराभव पत्करावा लागला होता, तर चौथ्या स्थानावर असलेल्या उरुग्वेने पेरूवर 1-0 असा विजय मिळवून विश्वचषकात थेट प्रवेश केला.

### तुर्कीला हरवून पोर्तुगालची आघाडी

पोर्तुगालने कठीण प्रसंगातून मार्ग काढून गुरुवारी रात्री येथे तुर्कीचा 3-1 असा पराभव करीत या वर्षीच्या विश्वचषक फुटबॉल (विश्वचषक) स्पर्धेत प्रवेश मिळविण्याची आशा जिवंत ठेवली आहे. 85व्या मिनिटाला पंचांनी पेनॉल्टी देऊन तुर्कीला बरोबरी साधण्यासाठी संधी दिली होती.

kotak
**कोटक महिंद्र बँक लिमिटेड**
नोंदणीकृत कार्यालय : २७ बीकेसी, सी-२७, जी ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१. (महा.)
शाखा कार्यालय : कोटक महिंद्र बँक लि. नित्या युनिट्री, झोन-२, येरवडा नगर, पुणे- ४११ ००६, महा.

**लिलाव तथा विक्रीकरिता जाहिर सूचना**

तमाम जनतेस व विशेषत: कर्जदार/सह-कर्जदार/हमीदारांना याद्वारे **सूचना** देण्यात येत आहे की, प्रतिभूत धनकोंकडे गहाण प्रभारित खालील निर्देशित मालमत्ता जिचा प्रत्यक्ष ताबा कोटक महिंद्र बँक लिमिटेड प्रतिभूत धनको यांच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांद्वारे घेण्यात आला होता त्या मालमत्तांची कोटक महिंद्र बँक लिमिटेड खालील निर्देशित तारखेस **जशी आहे जेथे आहे, जशी आहे जी आहे व जी काही आहे तेथे आहे** तत्त्वावर विक्री करण्यात येत आहे. आमचे सेल्स ॲन्ड मार्केटिंग व ई-लिलाव सेवा भागीदार - मे. सी१ इंडिया प्रा. लि. यांच्या वेबपोर्टलअर्थात www.c1india.com च्या माध्यमातून अधोहस्ताक्षरितांद्वारे स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ऑनलाइन प्रस्ताव मागविण्यात येत आहेत, ज्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे :

| कर्जदार/हमीदार/गहाणवटदारांचे नाव | मागणी सूचना रक्कम | स्थावर मालमत्तेचे विवरण |
|---|---|---|
| कर्ज खाते क्र. : **एचएफ३७३६९०९७** **१) संकेत उत्तम राहेगावकर** **२) तेजस्वीनी किशोर पंडित** | मागणी सूचना दिनांक ०८.०१.२०२१ रु. ५०,४७,२७९.२५/- (रु. पन्नास लाख सत्तेचाळीस हजार दोनशे एकोणऐंशी व पंचवीस पैसे मात्र) | स्थावर मालमत्तेचा सर्व भाग व भूखंड धारक : फ्लॅट क्र. ८, मोजमापित एकूण ९२० चौ.फूट (बिल्ट अप क्षेत्र), ३ रा मजला, सुयोग सीएचएसएल, सीटीएस क्र. ५९१, रास्ता पेठ, पुणे-४११००१. अधिक तपशीलाचे विवरण विक्री कराराची तारीख १४.०६.१९९१. ● ताबा प्रकार : **प्रत्यक्ष** |

| राखीव मूल्य | बोली रक्कमेच्या १०% इसारा रक्कम ठेव (इरठे) |
|---|---|
| रु. ७३,६०,०००/- (रु. त्र्याहत्तर लाख साठ हजार मात्र) | रु. ७,३६,०००/- (रु. सात लाख छत्तीस हजार मात्र) |

| बोली विस्तार रक्कम | स्थावर मालमत्तेच्या परिक्षणाची तारीख | लिलावाची तारीख व वेळ |
|---|---|---|
| रु. ५०,०००/- | दि. २५.०४.२०२२ रोजीपासून स. ११.०० वा. ते दु. १२.०० वा. | दि. ०५.०५.२०२२ रोजीपासून दु. १२.०० ते दु. ३.०० वा. |

**सादरीकरणाकरिता अंतिम तारीखेचे प्रस्ताव/इरठे : दि. ०४.०५.२०२२ रोजी सायं. ५.०० पर्यंत**

**विक्रीच्या महत्त्वाच्या अटी व शर्ती :**
१. लिलाव प्रक्रियेमध्ये विहित अनुसार बोली दस्तावेज यांच्या पुढील अटी व शर्ती यांच्या अनुसार आयोजित करण्यात येत आहे. बोलीदार आमचे सेल्स व मार्केटिंग व ई-लिलाव सर्व्हिस प्रदाते मे. सी१ इंडिया प्रा. लि. अर्थात https://www.bankeauctions.com यांना बोली दस्तावेज, ऑनलाइन सादरीकरणाकरिताचा ई-लिलाव व बोली प्रपत्र यांच्यासाठी विहित प्रतिभूत संपत्तीचा तपशील जाणून घेण्याकरिता संपर्क साधावा.
२. सर्व इच्छुक खरेदीदार/बोलीदार यांनी वरील निर्देशित वेब पोर्टल https://www.bankeauctions.com वर त्यांचे नाव नोंदणीकरण करणे आवश्यक आहे व त्यांचे युजर आयडी व पासवर्ड जनरेट करून ई-लिलावामध्ये सहभागी होण्याकरिता स्वत:चे नोंदणीकरण करणे आवश्यक आहे.
३. कोणतीही चौकशी, माहिती, सहाय्य, प्रक्रिया व ऑनलाइन ई-लिलावाचे प्रशिक्षण घेण्याकरिता प्रस्तावित बोलीदारांनी मे. सी१ इंडिया प्रा. लि. **विभाग** यांना आमचे सेल्स ॲन्ड मार्केटिंग मेथे संपर्क साधावा व ई-लिलाव सर्व्हिस प्रदाते मे. सी१ इंडिया प्रा. लि. यांना **मे. विनोद चौहान** यांच्या मार्फत **दूर. क्र. +९१ ७२९१९७११२४,२५,२६, मो. क्र. +९८१३८८७९३१ व ईमेल आमडी : delhi@c1india.com & support@bankeauctions.com वर संपर्क साधावा.**
४. प्राधिकृत अधिकारी यांची सर्वोत्तम माहिती व ज्ञानानुसार मालमत्तेवर कोणतेही भार नाहीत. तथापि, इच्छुक बोलीदारांनी त्यांची बोली सादर करण्यापूर्वी मालमत्तेसंदर्भातील भार, हक्क आदींसंदर्भात तसेच मालमत्तेवर प्रभाव पाडणारे दावे/हक्क/देणी यांसंदर्भात स्वत:हून स्वतंत्र चौकशी तारीख व वेळेपर्यंत करावी. त्यांची पडताळणी करून खात्री करून घ्यावी. ई-लिलाव जाहिरात ही केएमबीएल बँकेची कोणतीही वचनबद्धता वा कोणत्याही सादरीकरणात स्थापित करीत नाही किंवा स्थापित करीत असल्याचे मानीत नाही. कोणतेही तिसऱ्या पक्षाचे कोणत्याही स्वरूपातील दावे/हक्क/देणी यांकरिता प्राधिकृत अधिकारी/प्रतिभूत धनको जबाबदार नसतील. ई-लिलाव जाहिरात केएमबीएल यांच्या कोणत्याही तक्रार तसेच कोणत्याही सादरीकरणाकरिता जबाबदार नसेल. प्राधिकृत अधिकारी/प्रतिभूत धनको कोणत्याही तिसरे पक्ष यांचे दावे/हक्क/ देणी यांकरिता कोणत्याही प्रकारे जबाबदार नसतील.
५. इच्छुक खरेदीदार/बोलीदारांनी वेबपोर्टल (https://www.bankeauctions.com) च्या माध्यमातून पॅन कार्ड, आधार कार्ड, रहिवासी पुरावा, कंपनीच्या संदर्भात बोर्ड ठराव तसेच पत्त्याचा पुरावा यांच्या स्व-साक्षांकित प्रतींसमवेता प्रतिभूत संपत्तीच्या व्याजरहित परतावायोग्य इसारा रक्कम ठेवीच्या (इरठे) **कोटक महिंद्रा बँक लि.,** या नावे जारी धनाकर्षाच्या स्वरूपातील प्रदानाचा तपशील सादर करावा/अपलोड करावा.

कर्जदार/गहाणवटदार/हमीदार यांना सदर **सूचनेच्या प्रसिद्धी तारखेपासून ३० दिवसांच्या आत व्याज व खर्च यांच्यासह** वरील निर्देशित थकबाकीच्या प्रदानाकरिता संपूर्ण दायित्वांवर सरफैसी कायद्याच्या **नियम ६(२), ८(६) व ९(१) अंतर्गत** वैधानिक तीस दिवसांची वैधानिक सूचना देण्यात येत आहे यात कसूर झाल्यास वरील निर्देशित अटी व शर्ती अनुसार प्रतिभूत मालमत्तेची विक्री करण्यात येईल. जर विक्री सूचनेमध्ये काही अडथळे असल्यास तसेच इंग्रजी व स्थानिक वृत्तपत्रामधील प्रसिद्धी दरम्यान काही अडथळे असल्यास सदर इंग्रजी आवृत्ती पाहावी व अंतिम प्रत म्हणून विचारात घ्यावी. जर कर्जदार/ हमीदार/ गहाणवटदार यांनी प्रतिभूत धनको यांचे थकित रक्कमेचे संपूर्ण प्रदान विक्रीच्या तारखेपूर्वी करावे व लिलाव रद्द करण्यात येईल.

विक्रीच्या अधिक माहिती अटी व शर्तींकरिता, कृपया आमच्या अधिकृत वेबसाइट https://www.kotak.com/en/bank-auction.html वर भेट द्या किंवा वरील दिलेल्या बँकेचे प्रादेशिक कार्यालय येथे प्राधिकृत अधिकारी, **श्री. अशोक मोटवाणी (मो.) ९८७३७३७३५१ किंवा इस्माईल देशमुख (मो.)** ८७६७४३८२५३ यांच्याशी संपर्क साधावा.

विशेष निर्देश : कोटक महिंद्र बँक लिमिटेड (केएमबीएल) यांच्या वतीने आमचे सेवा प्रदाते मे. सी१ इंडिया प्रा. लि. यांच्याद्वारे विहित तारखेस ई-लिलाव आयोजित करण्यात येईल ज्यावेळी बोरीदार राखीव मूल्याच्या वर त्यांच्या निवडीनुसार त्यांच्या घरातून/कार्यालयातून/जागेतून दर सादर करू शकतील. इंटरनेट कनेक्टिव्हिटी व अन्य आवश्यक बाबींची खात्री बोलीदारांनी स्वत:हून करावी. कृपया नोंद घ्यावी की इंटरनेट जोडणी खंडित होणे (कोणत्याही कारणास्तव) याची जबाबदारी बोलीदाराचीच असेल. कोणत्याही आकस्मिकपरिस्थितीसाठी केएमबीएल वा मे. सी१ इंडिया प्रा. लि. हे जबाबदार नसतील. अशा आकस्मिक परिस्थितीकरिता बोलीदारांनी आवश्यक व्यवस्था/पर्याय तयार ठेवावेत जेणेकरून अशा परिस्थिती हाताळता येऊ शकतील व ई-लिलावात यशस्वीरीत्यासहभाग घेता येऊ शकेल. तथापि, बोलीदारांनी अशी गुंतागुंतीची परिस्थिती टाळण्यासाठी अखेरच्या क्षणी त्यांची बोली दाखल करणे, सुधारित करणे टाळावे.

**दिनांक : २४.०३.२०२२** सही/-
**ठिकाण : मुंबई** प्राधिकृत अधिकारी कोटक महिंद्र बँक लिमिटेडकरिता

